# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०६/२०२४ (मंगळवार) सकाळ

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे पारशिवनी अंतर्गत जिल्हा परीषद शाळा परिसर महादुला येथे दि. १६/०६/२०२४ चे २२.०० वा. दि. १७/०६/२०२४ चे ०२.०० वा. पर्यंत गावातील सौरभ वासनिक यांचे लग्न समारंभाला जखमी फिर्यादी नामे प्रशील धोंडबाजी सहारे, वय २५ वर्ष रा. महादुला यांचेशी जुन्या भांडणाचे कारणावरून आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी लक्की रंगारी याने व आरोपी रोहन श्रावन रंगारी, वय १९ वर्ष याने त्याचे जवळ असलेल्या लोखंडी धारदार सतुरने जखमीवर वार करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केला. लग्न मंडपात असलेल्या लोकांनी जख्मीस उपचाराकरीता ग्रमिण रुग्णालय पारशिवनी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याचावर प्रथमउपचार करुन पुढील उपचाराकरीता त्यास नागपुर येथे रेफर केले असता नातेवाईकांनी जखमीस ॲलेक्सीस हॉस्पीटल नागपुर येथे नेवुन भरती केले असुन जखमीवर उपचार सुरु आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून आरोपीतांविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०७, ५०४, ५०६, ३४ भादंवी अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीतांना पारशिवनी पोलीसांनी अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक थोरात यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर